# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आपत्ती व्यवस्थापन विभाग**
**जा.क्र. मनपा/आ.व्य./ /२०२३-२४**
**दि.**

## || प्रेस नोट ||

पर्यावरण सुरक्षित राखण्याच्या उद्देशाने वायू प्रदूषणा बरोबरच ध्वनी प्रदूषण रोखून दिवाळी उत्सव शांततेत, कायदा व सुव्यवस्था राखत साजरा करणे करीता मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक, श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी नागरीकांना आवाहन केलेले आहे.

यावेळी आयुक्त महोदयांनी नागरीकांना कमी ध्वनीचे, कमी धुराचे फटाक्यांचा वापर करणे, फटाके वाजवताना सायंकाळी ०७:०० ते १०:०० या वेळेच्या मर्यादेमध्ये फटाके वाजविणे, फटाक्यांमुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, जेष्ठ नागरीक, लहान मुले, गरोदर स्त्रीया, आजारी व्यक्ती यांची मुख्यत्वेकरून श्वसनाचे विकार असणाऱ्यांची विशेष काळजी घेणे बाबत आवाहन केले आहे.

तसेच दिवाळी सणानिमित्त पणत्या, दिवे, मेणबत्त्या खरेदी करताना कुटीरोद्योग, लघुउद्योगांना चालना मिळेल अशा विक्रेत्यांकडे खरेदी करणे. प्लास्टीकमुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास होत असल्याने नागरीकांनी प्लास्टीकचा वापर करणे टाळावे. फटाक्यांमुळे शहरामध्ये विविध ठिकाणी आग लागण्याची प्रमाण वाढते त्या अनुषंगाने इमारत, घर, सोसायटी परीसरामध्ये उभी वाहने, अडगळीची ठिकाणे, सुका कचरा गोळा केलेली ठिकाणे इ. ठिकाणी फटाके वाजविणे टाळावे. तसेच आगीपासून सुरक्षेच्या दृष्टीकोनातून प्राथमिक व्यवस्था जसे पाणी, माती, फायर एक्टींग्युशर्स इ. सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी व महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन किंवा अग्निशमन विभागास ०२२-२८१९७६३७ / ८६५७९४९७१५/ ८२९१३७०१३८ या क्रमांकावर तात्काळ कळवावे.

सुरक्षित दिवाळी उत्सव साजरा करणेकामी आपत्ती व्यवस्थापन तथा अग्निशमन विभाग २४X७ कार्यरत असून दिवाळी सण साजरा करत असताना स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर ठेवणेकरीता नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. तसेच आयुक्त तथा प्रशासक, श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सर्व नागरीकांना दिवाळी सणानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**(मारूती गायकवाड)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**